**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai – 400 020
Phone : +91 22 2203 1879
Fax : +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग,
मुंबई - ४०० ०२०.
Telegram: UNIWOMEN
Website : sndt.ac.in

आस्था - ०१/नस्ती -१२/२०२३-२४/ 745

जूलै ०३, २०२३

# परिपत्रक

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठामध्ये १. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना व २. संचालक, विद्यार्थी विकास या पदांवर मा. कुलगुरू यांच्यामार्फत नामनिर्देशन करणे प्रस्तावित असून, त्या अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम २३ (क) व कलम २३ (ख) च्या तरतुदी अंतर्गत महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, अधिसूचना दिनांक १०/१०/२०१८ अन्वये १. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना व २. संचालक, विद्यार्थी विकास या पदांच्या वित्तलब्धी, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्तीबाबत विहित केलेल्या एकरूप परिनियम क्र. ०१/२०१८ व एकरूप परिनियम क्र.०२/२०१८ नुसार सदर पदांकरिता, अध्यापनाचा किमान एकूण दहा वर्षांचा अनुभव असणाऱ्या आणि अभ्यासेतर व विस्तार कृतिकार्यक्रम क्षेत्रामध्ये समाधानकारक कामगिरी पार पाडलेल्या अध्यापकांमधून मा. कुलगुरुंकडून नामनिर्देशित करण्याकरिता इच्छुक पात्र अध्यापकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदासाठीचे अर्ज, अर्हता व सेवेच्या अटी शर्ती विस्तुत स्वरुपात विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. पदांची नावे खालील प्रमाणे :

१. **संचालक, राष्ट्रीय सेवा योजना**
२. **संचालक, विद्यार्थी विकास**

सदर पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच वित्तलब्धी, पदावधी, वयोमर्यादा आणि सेवेच्या अटी व शर्ती ह्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियमाच्या कलम २३ (क) व कलम २३(ख) तसेच एकरूप परिनियम क्र. ०१/२०१८ व ०२/२०१८ मधील तरतुदींनुसार तसेच शासनाने याबाबत वेळोवेळी विहित केल्यानुसार राहतील. एकरूप परिनियमांची प्रत सोबत अवलोकनार्थ जोडण्यात येत आहे.

इच्छुक पात्र अध्यापकांनी दिनांक **०५ जूलै २०२३ ते ०५ ऑगस्ट २०२३** या कालावधीमध्ये श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या **sndt.ac.in** या संकेतस्थळावरून अर्जाची प्रत काढून व तो संपूर्ण भरुन अर्ज करावा. सदर अर्जाची प्रिंट काढून अर्जासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे (शैक्षणिक, अनुभवाची, प्रवर्गाची माहिती दर्शविणारी, वयाचा दाखला, अंतिम वेतनाच्या प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत व इतर तदनुषंगिक कागदपत्रे) कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, ०१, नाथीबाई ठाकरसी रोड, मुंबई - ४०० ०२० या कार्यालयामध्ये दिनांक **०५ ऑगस्ट २०२३** पर्यंत सादर करावेत. या मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**(डॉ. विलास द. नांदवडेकर)**
**कुलसचिव**

प्रत:
१. मा. कुलगुरू, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
२. मा. संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व संस्था
३. मा. प्राचार्य विद्यापीठाशी संचलित व संलग्नीत सर्व महाविद्यालये
४. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग

**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai – 400 020.
Phone : +91 22 2203 1879
Fax : +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ,
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग,
मुंबई - ४०० ०२०.
Telegram: UNIWOMEN
Website : sndt.ac.in

**पदनाम : संचालक, राष्ट्रीय सेवा योजना :**

१. **नामनिर्देशन प्रक्रिया :** कुलगुरू, पात्र इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवतील आणि त्यांच्यामधून योग्य व्यक्तीला, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून तीन वर्षाच्या पदावधीकरिता, जो आणखी एक मुदतींसाठी नवीकृत करता येईल - नामनिर्देशित करील.

याबाबत मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यता प्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ सदर पदावर प्रतिनियुक्ती झालेल्या व्यक्तिच्या जागी दुस-या व्यक्तिची नेमणूक त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या निकषानुसार करू शकेल.

२. **वित्तलब्धी** - संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून नामनिर्देशित केलेली व्यक्ती, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून तिचे नामनिर्देशन केल्याचा दिनांकास तिच्या पूर्वीच्या सेवेत असताना तिला जितकी वित्तलब्धी व वेतनमान मिळत असेल तितकी वित्तलब्धी व वेतनमान मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ या कडून मिळण्यास हक्कदार असेल.

३. **वय :** संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, या पदाच्या निमनिर्देशनासाठी इच्छुक असलेल्या उमेदवाराचे वय हे नामनिर्देशनाच्या वेळेस ५० वर्षापेक्षा जास्त असणार नाही.

४. **सेवेच्या अटी व शर्ती -**

१. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, याच्या सेवेच्या अटी व शर्ती हया, त्याच्या मुळ पदाच्या अटी व शर्तीप्रमाणेच असतील आणि संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून त्याच्या पदावधी दरम्यान त्याला अहितकारक होईल अशा प्रकारे त्या बदलता येणार नाहीत.
२. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून नामनिर्देशन झाल्यावर, त्याच्या मूळ कायम पदावर त्याने घेतलेले अंतिम वेतन संरक्षित केले जाईल.
३. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून नामनिर्देशित झालेल्या व्यक्तीचा, नामनिर्देशनापूर्वी तिने धारण केलेल्या कायम पदावर धारणाधिकार असेल आणि त्या पदाच्या सेवेच्या अटी व शर्तीनुसार ती तिच्या मूळ पदावरून सेवानिवृत्त झाल्याप्रमाणे असेल.
४. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, हा थेट कुलगुरुंच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली काम करील.
५. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, यास कुलगुरुला उद्देशून एक महिन्याची नोटीस देऊन, आपल्या पदाचा लेखी स्वरूपात त्याचा स्वाक्षरीने राजीनामा देता येईल आणि कुलगुरुने त्याचा राजीनामा स्वीकारल्यावर किंवा उक्त नोटीशीचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून यापैकी जे अगोदर घडेल तेव्हापासून, त्याचे आपले पद धारण करण्याचे बंद होईल.
६. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, यास, कुलगुयकडून एक महिन्याची लेखी नोटीस देऊन त्याच्या पदावरून कार्यमुक्त करण्यात येईल.

Registrar
SNDT Women's University
Mumbai - 20.

**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai – 400 020.
Phone : +91 22 2203 1879
Fax : +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ,
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग,
मुंबई - ४०० ०२०.
Telegram: UNIWOMEN
Website : sndt.ac.in

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियमाच्या कलम २३(ख)**

**संचालक, राष्ट्रीय सेवा योजना पदाचे अधिकार व कर्तव्ये :**

१. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना हा, अध्यापनाचा किमान एकूण दहा वर्षाचा अनुभव असणा-या, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून किमान तीन वर्षाचा अनुभव असणा-या आणि राष्ट्रीय सेवा योजना कृतिकार्यक्रम क्षेत्रामध्ये समाधानकारक कामगिरी पार पाडलेल्या अध्यापकांमधून कुलगुरू नामनिर्देशित करण्यात येईल.

२. त्याच्या वित्तलब्धी, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्ती परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असतील.

३. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना हा -

(एक) महाविद्यालये, परिसंस्था, आणि विद्यापीठ विभाग यांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विविध कार्यक्रमांना चालना देण्यासाठी, त्यास समन्वय साधण्यासाठी व ते आयोजित करण्यासाठी काम करील,

(दोन) राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसाठी विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यशाळा, चर्चासत्रे, शिबिरे, स्पर्धा आयोजित करील,

(तीन) राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धासाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देईल,

(चार) राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टये पार पाडण्यासाठी राज्य राष्ट्रीय सेवा योजना समन्वयकाने व विद्यापीठ प्राधिकरणांनी त्याला नेमून दिलेले इतर कोणतेही काम हाती घेईल,

(पाच) याअधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विहित केलेले असतील असे, किंवा कुलगुरूकडून व प्र-कुलगुरूकडून वेळोवेळी त्यास नेमून देण्यात येतील असे अन्य अधिकार वापरील आणि अशी अन्य कर्तव्ये पार पाडील.

Registrar
SNDT Women's University
Mumbai - 20.

**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai – 400 020.
Phone : +91 22 2203 1879
Fax : +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ,
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग,
मुंबई - ४०० ०२०.
Telegram: UNIWOMEN
Website : sndt.ac.in

**पदनाम : विद्यार्थी विकास**

१. **नामनिर्देशन प्रक्रिया :** कुलगुरू, पात्र इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवतील आणि त्यांच्यामधून योग्य व्यक्तीला, संचालक, विद्यार्थी विकास, म्हणून तीन वर्षाच्या पदावधीकरिता, जो आणखी एक मुदतीसाठी नवीकृत करता येईल - नामनिर्देशित करील. याबाबत मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यता प्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ सदर पदावर प्रतिनियुक्ती झालेल्या व्यक्तिच्या जागी दुस-या व्यक्तिची नेमणूक त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या निकषानुसार करू शकेल.

२. **वित्तलब्धी -** संचालक, विद्यार्थी विकास, म्हणून नामनिर्देशित केलेली व्यक्ती, संचालक, विद्यार्थी विकास, म्हणून तिचे नामनिर्देशन केल्याचा दिनांकास तिच्या पूर्वीच्या सेवेत असताना तिला जितकी वित्तलब्धी व वेतनमान मिळत असेल तितकी वित्तलब्धी व वेतनमान मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ या कडून मिळण्यास हक्कदार असेल.

३. **वय :** संचालक, विद्यार्थी विकास, या पदाच्या निमनिर्देशनासाठी इच्छुक असलेल्या उमेदवाराचे वय हे नामनिर्देशनाच्या वेळेस ५० वर्षापेक्षा जास्त असणार नाही.

४. **सेवेच्या अटी व शर्ती -**

१. संचालक, विद्यार्थी विकास, याच्या सेवेच्या अटी व शर्ती हया, त्याच्या मुळ पदाच्या अटी व शर्तीप्रमाणेच असतील आणि संचालक, विद्यार्थी विकास, म्हणून त्याच्या पदावधी दरम्यान त्याला अहितकारक होईल अशा प्रकारे त्या बदलता येणार नाहीत.
२. संचालक, विद्यार्थी विकास, म्हणून नामनिर्देशन झाल्यावर, त्याच्या मूळ कायम पदावर त्याने घेतलेले अंतिम वेतन संरक्षित केले जाईल.
३. संचालक, विद्यार्थी विकास, म्हणून नामनिर्देशित झालेल्या व्यक्तीचा, नामनिर्देशनापूर्वी तिने धारण केलेल्या कायम पदावर धारणाधिकार असेल आणि त्या पदाच्या सेवेच्या अटी व शर्तीनुसार ती तिच्या मूळ पदावरून सेवानिवृत्त झाल्याप्रमाणे असेल.
४. संचालक, विद्यार्थी विकास, हा थेट कुलगुरुंच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली काम करील.
५. संचालक, विद्यार्थी विकास, यास कुलगुरूला उद्देशून एक महिन्याची नोटीस देऊन, आपल्या पदाचा लेखी स्वरूपात त्याचा स्वाक्षरीने राजीनामा देता येईल आणि कुलगुरुने त्याचा राजीनामा स्वीकारल्यावर किंवा उक्त नोटीशीचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून यापैकी जे अगोदर घडेल तेव्हापासून, त्याचे आपले पद धारण करण्याचे बंद होईल.
६. संचालक, विद्यार्थी विकास, यास, कुलगुरुकडून एक महिन्याची लेखी नोटीस देऊन त्याच्या पदावरून कार्यमुक्त करण्यात येईल.

Registrar
SNDT Women's University
Mumbai - 20.

**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai – 400 020.
Phone : +91 22 2203 1879
Fax : +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ,
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग,
मुंबई - ४०० ०२०.
Telegram: UNIWOMEN
Website : sndt.ac.in

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियमाच्या कलम २३(क)**

**संचालक, विद्यार्थी विकास योजना पदाचे अधिकार व कर्तव्ये :**

१. संचालक, विद्यार्थी विकास हा, अध्यापनाचा किमान एकूण दहा वर्षांचा अनुभव असणा-या आणि अभ्यासोत्तर व विस्तार कृतिकार्यक्रम क्षेत्रामध्ये समाधानकारक कामगिरी पार पाडलेल्या अध्यापकांमधून कुलगुरुंकडून नामनिर्देशित करण्यात येईल. तो कुलगुरुंच्या थेट अधीक्षणाखाली, निर्देशाखली व नियंत्रणाखाली काम करील.

२. त्याच्या वित्तलब्धी, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्ती परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असतील.

३. संचालक, विद्यार्थी विकास हा, -

(क) महाविद्यालये, परिसंस्था आणि विद्यापीठ विभाग यांमध्ये सांस्कृतिक, मनोरंजनापर आणि विद्यार्थी कल्याण कार्यक्रमांना चालना देण्याकरिता काम करील,

(ख) विद्यार्थ्यांसाठी नेतृत्व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करील,

(ग) महाविद्यालये, परिसंस्था आणि विद्यापीठ विभाग यांमध्ये विद्यार्थ्यांसाठी समुपदेशक आणि समुपदेशन कक्ष असल्याची खातरजमा करील,

(घ) रॅगिंग करण्यास प्रतिबंध समितत्या आणि पथके यांची रचना करील आणि विद्यापीठ, महाविद्यालये आणि परिसंस्था यांमध्ये रॅगिंग करण्यास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जात असल्याची खातरजमा करील,

(ड) विद्यार्थ्यांच्या तक्रारी आणि सर्वसाधारण कल्याण या गोष्टींमध्ये लक्ष घालील,

(च) विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्व घडविण्यासाठी मदत करील आणि त्यांचे नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी आणि त्यांना आत्मनिर्भर बनविप्सासाठी तयार करील.

(छ) प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मंडळे यांच्या संयुक्त विद्यमाने सांस्कृतिक व मनोरंजनपर कार्यक्रम आयोजित करील,

(ज) युवकांच्या अभिरूचीला चालना देईल आणि ललित व प्रयोगनिष्ठ कला, विशुध्द कला व साहित्यिक कौशल्ये वाढीस लागण्यसाठी युवकांची कौशल्य विकसित करील.

(झ) विद्यार्थ्यांकरिता विविध क्षेत्रांमध्ये विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देईल,

(त्र) विविध प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील

Registrar
SNDT Women's University
Mumbai - 20.